MHSN020017622025

# वाणिज्य दावा क्र. २/२०२५ मधील
# नि.५ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज मौ.शेडबाळ, ता.कागवाड, जि.बेळगाव येथील सर्वे क्र.२४८/२ मधील क्षेत्र ४ एकर ३८ गुंठे अकृषीक जमीनीमध्ये त्रयस्थ इसमाचे हित निर्माण करून वादींचे ताबेस प्रतिवादींनी अडथळा करु नये व त्यामध्ये व्यवसाय चालू ठेवू नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल करणेत आलेला आहे. (सदर मिळकतीस यापुढे सोयीकरीता 'वादग्रस्त मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे असे आहे की,

२. वादी हे बांधकाम गुत्तेदार असून स्टोन क्रशरचा त्यांचा व्यवसाय आहे. प्रतिवादी हे स्टोन क्रशर व्यवसायाचे परवानाधारक आहेत. वादी व प्रतिवादी हे स्टोन क्रशरचा व्यवसाय जय गिरनारी भागीदारी फर्म द्वारे वादग्रस्त मिळकतीत करतात. दि.१८/०१/२०२२ रोजी त्यांचेमध्ये नोटरीकृत समजूतीचा लेख झालेला आहे. सदर कराराप्रमाणे वादींनी १,२०,००,०००/- सदर व्यवसायामध्ये गुंतवायचे होते व वादींना व्यवसायाच्या नफ्यामध्ये ५० टक्के शेअर देण्यात आले होते. तसेच कराराप्रमाणे सदर व्यवसायाचे उत्पादन घाऊक दराने वादींना पुरवायचे होते. त्याकरीता एल.एल.पी करायची होती. परंतु काही कारणास्तव एलएलपी स्थापन झाली नाही. म्हणून वादी व प्रतिवादींनी नोटरीकृत भागीदारी फर्म दि.१०/०३/२०२२ रोजी स्थापन केली. त्याप्रमाणे दि.१७/०८/२०२२ रोजी डीड ऑफ ऑन गोइंग बिजनेस नोटरीकृत करण्यात आले. त्यानंतर जय गिरनारी प्रताप पाटील ॲण्ड असोसिएटस भागीदारी फर्म

स्थापन करण्यात आली. त्यावेळी प्रतिवादी हे वादग्रस्त मिळकतीचे मालक राहतील असे तांत्रीकदृष्टया ठरविले होते व त्यांनी ती रॉयल्टी भरायची होती. त्यानंतर त्यांचेमध्ये मर्जर डीड झाले. ते त्या कराराचा भाग होता. वादींनी कराराप्रमाणे रु.१,२०,००,०००/– सदर व्यवसायात गुंतविले. वादींनी भागीदारीपत्र झाल्यानंतर रु.९०,००,०००/– बॅक ऑफ बडोदा, शाखा– सांगली कडून व्यवसायासाठी कर्ज घेतले होते. प्रतिवादींनी केवळ रु.३९,४२,०००/– व्यवसायाकरीता भागीदारी फर्मला दिलेले आहेत. सदर कर्जाची परतफेड फर्मचे व्यवसायाचे नफ्यातून करावयाची होती. परंतु प्रतिवादींनी जुनी मशीनरी व्यवसायासाठी वापरल्याने त्याचे देखभालीसाठी फर्मचे व्यवसायामध्ये तोटा झाला. तसेच प्रतिवादी हे जय गिरनारी नावाने बेकायदेशीरपणे स्वतःचे फायदयासाठी व्यवसाय करू लागले. वादींनी प्रतिवादी क्र.१ ची भेट घेतली असता त्याने गुंतवणूक रकमेचे ३० टक्के रक्कम परत करण्याचे मान्य केले होते. परंतु प्रतिवादींनी तसे केले नाही. म्हणून वादींनी दि.२०/१२/२०२४ रोजी प्रतिवादींना पत्र पाठवले परंतु प्रतिवादींनी पत्राचे उत्तर दिले नाही.

३. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी बॅकेच्या कर्जाची परतफेड केली नाही. त्याबाबत वादींनी पोलिसात तक्रार दिली आहे. त्यानंतर वादींनी प्रतिवादींना भागीदारी व्यवसायाचे उत्पादन करण्याचे थांबविण्यास सांगितले. परंतु प्रतिवादींनी तसे करण्यास नकार दिला. दि.०३/०३/२०२५ रोजी प्रतिवादींनी वादींना कर्जाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी नोटीस पाठविली. प्रतिवादींनी सदर नोटीसला दि.०६/०३/२०२५ ला उत्तर दिले. वादींनी प्रतिवादींना फर्म रद्द करण्यासाठी वारंवार नोटीस पाठविल्या. म्हणून वादींनी प्रतिवादींविरूध्द निरंतर मनाई हुकुमाचा दावा दाखल केला. प्रतिवादींनी वादग्रस्त मिळकतीवर जय गिरनारी इन्फ्रा नावाने बेकायदेशीरपणे व्यवसाय सुरु करून स्टोन क्रशरचे उत्पादन परस्पर विक्री केले. प्रतिवादी हे वादींना वादग्रस्त मिळकतीमध्ये येणेस अडथळा करीत आहेत. म्हणून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केला आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादींनी भारतीय भागीदारी कायदा कलम ४८ मधील तरतूदीचे उल्लंघन करून भागीदारी फर्म रद्द करण्यासाठी दि.१२/०४/२०२५ रोजी त्यांना नोटीस पाठविली होती. वादी हे वादग्रस्त मिळकत व व्यवसायाचे एकमेव मालक नाहीत. भागीदारी फर्म जय गिरनारी प्रताप पाटील ॲण्ड असोसिएटस या नावाने वादग्रस्त मिळकतीवर त्यांनी व वादींनी व्यवसाय सुरु केला आहे. त्यांनी भागीदारी फर्ममध्ये रु.१,२०,००,०००/- गुंतवले आहेत. भागीदारी फर्मचे भागीदारीपत्र झालेनंतर त्यांनी बॅंक ऑफ बडोदाकडून रु.९०,००,०००/- चे कर्ज घेतले होते. वादींनी जुनी मशीनरी वापरून त्यांची फसवणूक केली. त्यांनी वादींकडे नफाखात्याची तपासणीची पत्राद्वारे विचारणा केली. परंतु वादीने उत्तर दिले नाही. वादी हे वादग्रस्त मिळकतीत स्वतःच्या मालकीचा जय गिरनारी इन्फ्रा या नावाने बेकायदेशीर व्यवसाय करीत आहेत. वादींनी बॅंकेचे कर्जाची परतफेड केलेली नाही. त्यांनी त्याबाबत पोलिस ठाणेत तक्रार दिलेली आहे. त्यांनी दि.२०/१२/२०२४ रोजी वादींना सदर उत्पादन थांबविणेस सांगितले. परंतु वादींनी तसे केले नाही. म्हणून त्यांनी दि.११/०१/२०२५ रोजी कायदेशीर नोटीस पाठविली. वादींनी उत्तरी नोटीस देवून तसे न करण्यास नकार दिला. वादींनी दि.१२/०४/२०२५ रोजी प्रतिवादींना भागीदारी फर्म रद्द करण्यासाठी नोटीस पाठविली. त्यांनी दि.२१/०४/२०२५ रोजी फर्मचे अकाऊंट सेटल झाल्याशिवाय फर्म रद्द होत नाही असे उत्तर पाठविले. त्यामुळे प्रतिवादी पैशांचा, नफ्याचा किंवा व्यवहारांचा तपशीलवार हिशोब मिळणेस पात्र आहेत. तसेच त्यांनी बॅंकेला सदरचे अकाऊंट गोठविण्याची विनंती केली. त्यांचे कडे कोणतीही रक्कम थकीत नाही. वादींनी वस्तुस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

५. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात व त्यावरील निष्कर्ष खालील

प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी प्रथमदर्शनी प्रकरण सिध्द केले आहे काय? | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय? | नाही. |
| ३. | अर्ज मंजूर न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय? | नाही. |
| ४. | आदेश काय? | अर्ज नामंजूर करणेत येत आहे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः**

६. वादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.जी.नांद्रे यांनी असा युक्तिवाद केला की, वादी हे वादग्रस्त मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. प्रतिवादींनी भागीदारी फर्ममधील अटींचा भंग केलेला आहे. म्हणून वादींनी प्रतिवादीस नोटीस पाठवून भागीदार फर्म रद्द केलेली आहे. परंतु प्रतिवादी हे वादग्रस्त मिळकतीवरील वादींचे ताबेस अडथळा करीत आहेत. त्यामुळे त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

७. प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्रीमती पी. एच.देवधर यांनी असा युक्तिवाद केला की, वादी हे वादग्रस्त मिळकतीचे एकमेव मालक व ताबेदार नाहीत. प्रतिवादींनी भागीदारी फर्ममधील अटींचा भंग केलेला नाही. भागीदारी फर्मचे पैशांचा, नफ्याचा किंवा व्यवहारांचा तपशीलवार हिशोब झालेला नाही. वादींनी प्रतिवादीस पाठविलेली नोटीस बेकायदेशीर आहे. म्हणून भागीदारी फर्म रद्द होवू शकत नाही. वादींनी बेकायदेशीरपणे

वादग्रस्त मिळकतीवर स्वतःचे फायदयासाठी व्यवसाय सुरु केला आहे. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

८. अर्ज, शपथपत्र व म्हणणे वाचून पाहिले. तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादींनी असे कथन केले आहे की, वादी हे वादग्रस्त मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. प्रतिवादींनी भागीदारी फर्ममधील अटींचा भंग केलेला आहे. म्हणून वादींनी प्रतिवादीस नोटीस पाठवून भागीदार फर्म रद्द केलेली आहे. तरीदेखील प्रतिवादी हे वादग्रस्त मिळकतीवरील वादींचे ताबेस अडथळा करीत आहेत.

९. वादी व प्रतिवादी यांनी जय गिरनारी प्रताप पाटील ॲण्ड असोसिएटस या नावाने वादग्रस्त मिळकतीवर व्यवसाय सुरु केला ही बाब वादातीत नाही. त्यामुळे वादग्रस्त मिळकत ही भागीदारी फर्मची मिळकत असून त्यावर वादी व प्रतिवादींचा दोघांचाही भागीदार म्हणून ताबा आहे. यावरून वादींचा वादग्रस्त मिळकतीवर एकमेव ताबा असल्याची बाब विश्वासार्ह वाटत नाही. तसेच वादींनी नमूद भागीदारी फर्म नोटीस पाठवून रद्द केल्याचे कथन केले आहे. परंतु प्रतिवादींनी भागीदारी फर्म रद्द झाल्याचे नाकारले आहे. भागीदारी फर्म रद्द करावयाची असल्यास भारतीय भागीदारी कायदयातील तरतुदीचा अवलंब करणे आवश्यक आहे. भागीदारी फर्मचे पैशांचा, नफ्याचा किंवा व्यवहारांचा तपशीलवार हिशोब झालेनंतर भागीदारी फर्म रद्द होणार आहे किंवा नाही हे पुराव्याअंती ठरणार आहे. वादग्रस्त मिळकतीवर भागीदारी फर्मचा व्यवसाय असल्यामुळे वादींचा वादग्रस्त मिळकतीवर एकमेव मालकी व ताबा प्रस्थापित होत नाही. त्यामुळे वादीतर्फे विधिज्ञ यांनी केलेला युक्तिवाद स्वीकारणेजोगा नाही. वरील बाबी विचारात घेता वादींची प्रथमदर्शनी बाजू विश्वासार्ह वाटत नाही. वरील विवेचनावरुन वादी हे प्रथमदर्शनी प्रकरण सिध्द करणेस अपयशी ठरल्याचे स्पष्ट होते. परिणामी मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ व ३ करीताः**

१०. वादी हे प्रथमदर्शनी प्रकरण सिध्द करणेस अपयशी ठरल्याने न्यायाचा समतोल त्यांचे बाजूने नाही. त्यामुळे वादींचे अपरिमित नुकसान होणार नाही. सबब मी मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करिताः**

११. वादी हे प्रथमदर्शनी प्रकरण सिध्द करणेस अपयशी ठरल्याने न्यायाचा समतोल त्यांचे बाजूने नाही. त्यामुळे वादींचे अपरिमित नुकसान होणार नाही. वरील विवेचन व मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष विचारात घेता अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.४ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करणेत येत आहे.

SHAKTI UTTAMRAO DESHMUKH

Digitally signed by SHAKTI UTTAMRAO DESHMUKH
Date: 2026.02.03 16:37:15 +0530

सांगली. ( श्रीमती श. उ. देशमुख )

दिनांक:-०२/०२/२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर,सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***K. U. Nadaf*** |
| Court | : | Civil Judge Sr.Dn., Sangli. |
| Date of order/judgment | : | 02/02/2026 |
| Signed by the Presiding Officer on | : | 03/02/2026 |
| Uploaded on | : | 03/02/2026 |